# गुरुमाई चिद्विलासानंद यांच्याद्वारे लिखित पुस्तक

# अंतःशुद्धीचे सोपान

## *उद्धरण ३*

प्रत्येक शास्त्रीय ग्रंथामध्ये ज्ञानी मनुष्याला अत्यंत उच्च दर्जा दिला गेला आहे. सिद्धयोगात आपण ज्ञानाची पूजा करतो. प्रत्यक्ष भगवंत त्याची प्रशंसा करतात जो ज्ञानाला स्वतःमध्ये धारण करतो. भगवद्गीतेमध्ये भगवान कृष्ण म्हणतात :

*चतुर्विधा भजन्ते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन।*
*आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ॥*

हे अर्जुना, चार प्रकारचे गुणिजन माझी आराधना करतात :
जे दुःखी आहेत, जे धनाची अपेक्षा करतात,
जे जिज्ञासू आहेत,
आणि जे ज्ञानी आहेत. [७:१६]

*तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते।*
*प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थमहं स च मम प्रियः॥*

त्यांमध्ये तो ज्ञानी सर्वश्रेष्ठ आहे जो निरंतर दृढ आहे,
जो केवळ परमेश्वराचा अनन्य भक्त आहे.
जो ज्ञानात निमग्न आहे,
त्याला मी अत्यंत प्रिय आहे आणि तो मला प्रिय आहे. [७:१७]

*उदाराः सर्व एवैते ज्ञानी त्वात्मैव मे मतम्।*
*आस्थितः स हि युक्तात्मा मामेवानुत्तमां गतिम्॥*

हे सर्व जिज्ञासू निश्चितच थोर आहेत;
परंतु जो ज्ञानामध्ये निमग्न आहे,
त्याला मी माझा आत्माच मानतो.

ज्याचे मन दृढ आहे,
तो केवळ माझ्यामध्ये म्हणजेच परम लक्ष्यामध्ये स्थित आहे. [७:१८]

तुमच्या लक्षात आले नाही का, की तुमच्या दैनंदिन जीवनातही जेव्हा तुम्हाला कोणी चांगला सल्ला देतो किंवा गहन समजुतीची गोष्ट उलगडून सांगतो, तेव्हा तुमच्यामध्ये अपार कृतज्ञतेचा आणि आदराचा भाव उचंबळून येतो? तुम्ही कोणत्याही परिस्थितीतून जात असाल किंवा आयुष्य कितीही कठीण असले, तरी तुम्हाला तो सल्ला अंगीकारावासा वाटतो आणि तुम्हाला ती व्यक्ती मनापासून आवडते. जर तुमच्याबाबतीत असे असेल, तर विचार करा, की परमेश्वराचे त्या मनुष्यावर किती प्रेम असेल ज्याने सत्य ज्ञानाला आपल्यामध्ये धारण केले आहे आणि चोवीस तास त्याला याचा बोध असतो.

एक माणूस दर्शनाच्या वेळी येऊन म्हणाला, “गुरुमाई, मी एका अंधाऱ्या भुयारातून बाहेर आलो आहे. आता मला फारच छान वाटते आहे.”

मी मनामध्ये ईश्वराला ह्या माणसाची काळजी घेतल्याबद्दल धन्यवाद दिले. तो बऱ्याच काळापासून क्लेश भोगत होता. आणि मग पुढच्याच श्वासाला तो म्हणाला, “पण मला अजूनही नीलबिंदूचे दर्शन झालेले नाही.”

मी त्याच्याकडे पाहून म्हटले, “तुझ्या अडचणींचा अंत झाला आहे; ही तर आभार मानण्याजोगी गोष्ट आहे.”

“पण. . . पण मला नीलबिंदूचे दर्शन झालेले नाही. इतक्या वर्षांनंतरही!” मग तो म्हणाला, “मी नीलबिंदू कोर्स घेणार आहे,” आणि मोठ्या अर्थपूर्ण दृष्टीने त्याने थेट माझ्या डोळ्यांत पाहिले; जणू तो सूचित करीत होता, की तो जेव्हा तिथे असेल, तेव्हा नीलबिंदूही तिथे प्रकट झालेला बरा.

© २०२२ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

गुरुमाई चिद्विलासानंद, *अंतःशुद्धीचे सोपान : दिव्य सद्‌गुणांचा योग,* अध्याय ४ ‘ज्ञानामध्ये दृढता,’ यामधून उद्धृत [चित्‌शक्ती पब्लिकेशन्स, २०१३], पृ. ५६-५७.